नांदेड शहर

प्रजावाणी ■ शुक्रवार, दि. ७ एप्रिल २०२३ ■ ५

# सायन्स कॉलेजमध्ये 'सायबर क्राईम' विषयावर पथनाट्य

नांदेड दि. ६ : सायन्स कॉलेज नांदेड आणि क्लिक हिल फाऊंडेशन व नांदेड पोलीस च्या संयुक्त विद्यमाने सायबर क्राईम विषयी जनजागृती मोहीमे अंतर्गत पथनाट्य सादर करून महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली. आपार सामाजिक संस्था चे सुनील लवडे आणि त्यांची टीम व नांदेड सायबर सेल चे आदरणीय काशिनाथ कारखेडे कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आजच्या काळामध्ये इंटरनेट वापरत असताना आपण किती सुरक्षित आहोत आणि आपल्याला कशा प्रकारच्या समस्या येतात, त्यामध्ये अनोळखी लोकांचे फ्रेंड रिक्वेस्ट घेणे, आपली वैयक्तिक माहिती सोशल मिडियावर टाकताना कशा प्रकारची काळजी घ्यावी, फ्री प डाऊनलोड करताना त्याची माहिती जाणून घेणे, सोशल मीडियावर दुसऱ्यांच्या नावे अकाउंट उघडले जातात, सोशल मीडियावर अश्लील कमेंट केली जाते, अशा अनेक समस्या आपल्याला जाणवतात त्यापासून आपला कसा बचाव करावा व सावधगिरी बाळगावी याबद्दल पथनाट्य टीमने सुंदर असं पथनाट्य सादरीकरण केलं आणि या पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली.



यावेळी प्राचार्य डॉ. डी. यु. गवई, उपप्राचार्य व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अरुणा राजेंद्र शुक्ला, डॉ. ए. एस. बनसोडे, डॉ. किरण शिळेवार, डॉ. भगुरे, प्रा. एस. एफ. गोरे, डॉ. प्रीता बोरकर, डॉ. रेखा वाडेकर, प्रा. अजय हिवरे, दिलीप कापुरे, शंकर पतंगे आणि अन्य प्राध्यापक मंडळी व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राध्यापक मंडळी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.